दुरितांचे तिमिर जावो!

शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित

# जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर

ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद ४१३६०३

# राष्ट्रीय सेवा योजना

## सन २०१९–२०




# नियमित कार्यक्रम अहवाल


**प्रा.सुर्यकांत आगलावे**
कार्यक्रमाधिकारी तथा
उस्मानाबाद जिल्हा समन्वयक रा.से.यो.

**प्रा.डॉ.गुंडू राठोड**
कार्यक्रमाधिकारी

**डॉ.उमाकांत चनशेट्टी**
प्राचार्य
जवाहर महाविद्यालय, अणदूर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

# जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर

ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद ४१३६०३

## राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम सन २०१९—२०

## अहवाल

**शैक्षणिक वर्ष २०१८—१९ प्रमाणे याही वर्षी आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागास नियमित कार्यक्रमासाठी २०० स्वयंसेवक व वार्षिक विशेष शिबीरासाठी १०० स्वयंसेवकाची मंजूरी विद्यापीठाकडून प्राप्त झाली. त्यानुसार सन २०१९—२० या शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयात नियमित कार्यक्रमांतर्गत खालील कार्यक्रम राबविण्यात आले.**

**१. आव्हान २०१९ च्या निवड चाचणीत सहभाग:** आव्हान २०१९ नांदेड साठी दि.२५/४/२०१९ रोजी विद्यापीठ उपपरिसर उस्मानाबाद येथे निवड चाचणी घेण्यात आली. त्यामध्ये जिल्हा समन्वयक तथा कार्यक्रम अधिकारी प्रा.सुर्यकांत आगलावे व स्वयंसेवक १. कु.शिंदे स्नेहा गुणाजी, २. कु.शिंदे जयश्री धनाजी, ३.कु. बिराजदार दिपाली प्रकाश, ४. चव्हाण संतोष खंडू, ५.वलदोडे ओंकार गौरीशंकर यांनी सहभाग घेतला व त्यांची निवड ही झाली.



**२. आव्हान २०१९ नांदेड मध्ये सहभाग:** दि.३ जून ते १२ जून २०१९ दरम्यान स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे झालेल्या

आव्हान—आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरामध्ये ५ स्वयंसेवक कु.शिंदे स्नेहा



गुणाजी, कु. शिंदे जयश्री धनाजी, कु. बिराजदार दिपाली प्रकाश, चव्हाण संतोष खंडू, वलदोडे ओंकार गौरीशंकर यांनी सहभाग घेतला.



**३. आंतरराष्ट्रीय योग दिनः** दि. २१/६/२०१९ रोजी सकाळी ठीक



७:०० वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये ५ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर चे सचिव आदरणिय सि.ना. आलुरे गुरूजी यांच्या हस्ते सरस्वतीचे पूजन करून सुरूवात करण्यात आली. ३ वेळा ओंकार व श्लोक म्हणून योगाभ्यास सुरू केला.



ऑर्म अप, जॉगींग, उभे राहून काही आसने, बसून काही आसने, पोटावर झोपून काही आसने व पाटीवर झोपून काही आसने घेण्यात आली. त्यानंतर



प्राणायाम व ध्यान घेण्यात आले. शेवटी श्री.सि.ना. आलुरे गुरूजी यांनी

विद्यार्थ्यांना व शिक्षकांना योगाचे महत्व सांगून मार्गदर्शन केले.



सुत्र संचलन जवाहर विद्यालय, अणदूरचे सहशिक्षक जयहिंद पवार यांनी केले. योगाचे प्रात्यक्षिक प्रा. सुर्यकांत आगलावे व प्रा.डॉ.मल्लिनाथ बिराजदार यांनी करून दाखवले. श्री प्रविण गुरव यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी संस्थेचे कोषाध्यक्ष श्री.गो.का.बिच्चे गुरूजी, श्रीमंत मुळे गुरूजी, प्राचार्य डॉ. उमांकात चनशेट्टी, प्राचार्य विवेकानंद स्वामी, प्राध्यापक, शिक्षक व १५०० विद्यार्थी सहभागी होते.

**४. वृक्षारोपण व श्रमदान:** दि. २४/६/२०१९ रोजी महाविद्यालयाच्या पूढे व माठीमागे एकूण २०० झाडे लावण्यासाठी खड्डे खोदून त्यात काळी माती टाकण्यात आली. नंतर शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर चे सचिव आदरणिय सि.ना.आलुरे गुरूजी, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, प्राध्यापक व



विद्यार्थी यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले.









वृक्षाला पाणी घालण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांना देण्यात आली.

**५. <u>राजर्षी शाहू महाराज जयंती</u>:** दि. २६/६/२०१९ रोजी महाविद्यालयामध्ये राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रतिमा पूजनानंतर इतिहास विभाग प्रमूख प्रा.डॉ.सुनिल रजपूत यांनी विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याबद्दल सांगून त्याचा इतिहास सांगितला. प्रा.डॉ.मल्लिनाथ बिराजदार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**६. <u>वसंतराव नाईक जयंती</u>:** दि. १/७/२०१९ रोजी वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रतिमा पूजनानंतर प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**७. <u>तंबाखू मुक्त अभियान शपथ व वृक्षारोपनासाठी खड्डे</u>:** दि. ११/७/२०१९ रोजी महाविद्यालयात तंबाखू मुक्त अभियानाची शपथ घेण्यात आली.



नंतर श्रमदान करतांना विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये वृक्षारोपनासाठी खड्डे खोदले.













८. **वृक्षारोपण :** दि. १५/७/२०१९ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये अणदूर गावातील दमयंती पथ संस्थाच्या महिलांनी, प्राचार्यांनी, प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपन केले.

**९. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुण्यतिथी:** दि. १८/७/२०१९ रोजी महाविद्यालयात लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथी निमित्त प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रतिमा पूजनानंतर प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व आण्णाभाऊ साठे यांच्या कार्याबद्दल माहिती दिली.

**१०. लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती:** दि. १/८/२०१९ रोजी महाविद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाचा



कार्यक्रम घेण्यात आला. प्रतिमा पूजनानंतर कु.सुषमा नवगीरे हिने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या



कार्याबद्दल माहिती सांगितली व कु. स्नेहा शिंदे हिने लोकमान्य टिळक यांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली. नंतर प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**११. क्रांती दिन व राष्ट्रीय कार्यशाळेत सहभाग:** दि. ९ व १० ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयात **"इ कंटेन्ट डेव्हलपमेंट फॉर लर्निंग रिसोअर्सेस"** या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा घेण्यात आली. त्या कार्यशाळेमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या २० मुली व ७ मुले यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले.

**१२. वार्षिक नियोजन बैठक व स्वातंत्र्य दिनाची पूर्व तयारी:** दि. १४/८/२०१९ रोजी महाविद्यालयात हॉल नंबर १८ मध्ये दुपारी २ वाजता वार्षिक नियोजन बैठक घेण्यात आली. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रथम कार्यक्रम अधिकारी प्रा.सुर्यकांत आगलावे यांनी

प्रास्ताविक केले. प्रास्ताविक करतांना ऑनलाईन रजिस्टेशनची यादी वाचून दाखवली, वार्षिक नियोजनाचे वाचन केले, एन.एस.एस. चे महत्व सांगून विद्यार्थ्यांना एन.एस.एस.ची शपथ देण्यात दिली, डायऱ्या व बिल्ले वाटप केले. सल्लागार समितीतील प्रा.डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना एन.एस.एस. चे महत्व सांगून वर्षभर काम करण्याचे आवाहन केले. शेवटी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.जी.टी.



राठोड यांनी आभार मानले. चहापानानंतर स्वातंत्र्य दिनाची पूर्व तयारी करतांना विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला व पताके चिटकावून घेतले.

**१३. <u>स्वातंत्र्य दिन व वृक्षारोपण</u> :** दि. १५/८/२०१९ रोजी महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा करतांना विद्यार्थ्यांनी सकाळी लवकर येवून ध्वजारोहणाच्या ठिकाणी सडा व रांगोळी काढली. सकाळी ठीक ७.१५ वाजता प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी ध्वजारोहण व प्रतिमा पूजन केले.



त्यानंतर प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या व विद्यालयाच्या प्रभात फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी सर्वजण विद्यालयाकडे गेले. सकाळी ७.३० ते ८.३० दरम्यान



गावातून जाणाऱ्या प्रभात फेरीमध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गिते व राष्ट्र प्रेमाच्या घोषणा देऊन उत्सफूर्त सहभाग

घेतला. त्यानंतर महाविद्यालयामध्ये स्टेट बॅंक ऑफ इंडिया शाखा अणदूर यांनी दिलेल्या रोपाचे, बॅंकेचे अधिकारी, प्राचार्य व प्राध्यापकांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले.







सायंकाळी ६.१५ वाजता ध्वजावतरण करण्यात आले.


**१४. SRD/NRD पूर्व प्रशिक्षणासाठी निवड चाचणीत सहभाग:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र उस्मानाबाद येथे दि. २०/८/२०१९ रोजी SRD/NRD पूर्व प्रशिक्षणासाठी निवड चाचणी घेण्यात आली. त्यामध्ये कार्यक्रमाधिकारी प्रा. सुर्यकांत आगलावे, स्वयंसेवक शेख फतरू महेबूब व कु.पाटू प्रियंका विजय यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये कु.पाटू प्रियंका विजय हिची निवडही झाली.

**१५. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी मदत निधी संकलन:** दि. २१/८/२०१९ रोजी महाविद्यालयामध्ये कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी मदत निधी संकलीत करण्यात आला.






त्यामध्ये प्राध्यापक, शिक्षकत्तेर कर्मचारी व विद्यार्थी यांनी मिळून रू २,२५,४८१/- एवढा निधी गोळा करून शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर कडे सुपुर्द केला. त्यामध्ये संस्थेच्या सर्व शाखेचा निधी जमा करून मुख्यमंत्री



**शिक्षण प्रसारक मंडळाची पूरग्रस्तांना सात लाखांची मदत**

अणदूर । येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव तथा माजी आमदार सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली पूरग्रस्तांना मदतीसाठी मंगळाच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीत सात लाख रुपये जमा करण्यात आले. यात आलुरे गुरुजी यांनी वैयक्तिक ५० हजार रुपये, शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेकडून २५ हजार ३१९ रुपये, शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचालित सर्व शाळा, महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांचे एका दिवसाचे वेतन पाच लाख ८२हजार ३९० रुपये व विद्यार्थी निधी ४२ हजार २९१ रुपये, असा एकूण सात लाख रुपयांचा निधी (मंगळवार दि.२७) रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया अणदूर शाखेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा करण्यात आला.

सहाय्यता निधी कडे पाठवण्यात आला.

**१६. <u>विद्यापीठ वर्धापन दिनाची पूर्व तयारी</u>:** दि.२२/८/२०१९ रोजी महाविद्यालयामध्ये विद्यापीठ वर्धापन दिनाची पूर्व तयारी करतांना



महाविद्यालयातील इमारतीच्या आतील बाजूस केलेल्या वृक्षारोपनासाठी बाहेरील काळी माती आणून टाकली. परिसर स्वच्छता केली व पताके चिटकावून घेतले.

**१७. <u>विद्यापीठ वर्धापन दिन</u>:** दि. २३/८/२०१९ रोजी महाविद्यालयामध्ये विद्यापीठ वर्धापन दिन साजरा करतांना सकाळी ठीक ९.०० वाजता प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.







शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूरचे सचिव आदरणीय सि.ना.आलुरे गुरूजी व कोषाध्यक्ष श्री.गो.का.बिच्चे हे उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर मार्गदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यामध्ये स्वयंसेविका कु. रेश्मा गायकवाड व कु.प्रियंका बिराजदार यांनी विद्यापीठाबद्दल मनोगत व्यक्त केले. माजी प्राचार्या डॉ. अनिता मुदकण्णा, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, श्री.गो.का.बिच्चे व श्री.सि.ना.आलुरे गुरूजी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रा.डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी मानले.

## १८. सदृढ भारत अभियान शुभारंभः

दि.२९/८/२०१९ रोजी महाविद्यालयामध्ये हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रिडा दिन व सदृढ भारत [Fit India] अभियानाची सुरूवात करण्यासाठी क्रिडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना



विभागाच्या वतीने कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाला प्रमूख पाहूणे म्हणून रामकृष परमहंस महाविद्यालय, उस्मानाबादचे सेवानिवृत्त क्रिडा विभाग



**मोबाईलवर गेम खेळण्यापेक्षा मैदानी खेळ खेळा : शिंदे**

**अणदूर (प्रतिनिधी)-** तुम्ही खेळाडू असाल तर सर्वांच्या स्मरणात रहाल, खेळामुळे आपलं शरीर व मन सुदृढ राहील म्हणून फक्त मोबाईलवर गेम न खेळता मैदानावर घाम येईपर्यंत खेळत रहा. प्रत्येकाने स्वतःला कसा फिट ठेवता येईल याचा कानमंत्र घ्या, असे मत प्रा.काकासाहेब शिंदे यांनी व्यक्त केले.ते जवाहर महाविद्यालयामध्ये आयोजित क्रीडादिनानिमित्त कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.

याबाबत अधिक माहिती अशी की, अणदूर येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सुदृढ भारत अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ उमाकांत चनशेट्टी हे होते तर रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद येथील सेवानिवृत्त क्रीडा विभाग प्रमुख प्रा. काकासाहेब शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विशेष म्हणजे उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना यावेळी, पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी क्रीडा दिनानिमित्त सुदृढ भारत अभियान संदर्भात केलेल्या मार्गदर्शनाबद्दलची चित्रफीत दाखविण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांनी मेजर ध्यानचंद यांच्याबद्दल सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमासाठी श्री.लक्ष्मीकांत मिसे, प्रा.एस. आर.भारती, एन एस एस विभागाचे प्रा.डॉ. राठोड जी.टी., एस.के. कुलकर्णी यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक एन एस एस विभाग प्रमुख प्रा.एस. डी.आगलावे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.डॉ.एम.बी. बिराजदार यांनी केले तर क्रीडा विभाग प्रमुख प्रा.डॉ.उमेश सलगर यांनी मानले.

प्रमूख प्रा.काकासाहेब शिंदे तर अध्यक्ष

म्हणून प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी हे होते. प्रथम मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन पाहूण्यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.सुर्यकांत आगलावे यांनी केले. सदृढ भारत अभियानाची



# अणदुर येथे क्रीडा दिन विविध कार्यक्रमांनी साजरा

पुण्य नगरी । वृत्तसेवा

**अणदुर:** तुळजापूर तालुक्यातील अणदुर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सुदृढ भारत अभियानाचा शुभारंभ करून क्रीडा दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी तर रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद येथील सेवानिवृत्त क्रीडा विभाग प्रमुख प्रा. काकासाहेब शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रारंभी मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विशेष म्हणजे उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना यावेळी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्रीडा दिनानिमित्त सुदृढ भारत अभियान संदर्भात केलेल्या मार्गदर्शनाबद्दलची चित्रफीत दाखविण्यात आली. कार्यक्रमास लक्ष्मीकांत भिसे, प्रा. एस. आर. भारती, एन. एस. एस. विभागाचे प्रा. डॉ. जी. टी. राठोड, एस. के. कुलकर्णी आदींसह प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्तविक प्रा. एस. डी. आगलावे, सुत्रसंचालन प्रा. एम. बी. बिराजदार तर क्रीडा विभाग प्रमुख प्रा. उमेश सलगर यांनी आभार मानले.

सुरूवात सकाळी १०.०० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून मार्गदर्शनानी केली होती. त्याचे काही अंश विद्यार्थ्यांना स्क्रिनवर दाखण्यात आले. नंतर प्रा.काकासाहेब शिंदे यांनी विद्यार्थ्यांना क्रिडा दिनाचे महत्व सांगून आरोग्याचे महत्व सांगितले. अध्यक्षिय समारोपामध्ये प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



# विद्यार्थ्यांनो, मोबाइलवर गेम खेळण्यापेक्षा मैदानी खेळ खेळा

## प्रा. शिंदे यांचे मार्गदर्शन, सुदृढ भारत अभियानाचा शुभारंभ

प्रतिनिधी | अणदूर

'तुम्ही खेळाडू असाल तर सर्वांच्या स्मरणात रहाल, खेळामुळे आपले शरीर व मन सुदृढ राहते. त्यामुळे फक्त मोबाइलवर गेम न खेळता मैदानावर घाम येईपर्यंत मैदानी खेळ खेळा,' असे प्रा. काकासाहेब शिंदे यांनी सांगितले.

अणदूर येथील जवाहर विद्यालयात प्रा. शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

येथील शिक्षण प्रसारक मंडळाद्वारा संचालित जवाहर महाविद्यालयात क्रीडा दिनानिमित्त क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सुदृढ भारत अभियानाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. प्रमुख पाहुणे म्हणून रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद येथील सेवानिवृत्त क्रीडा विभागप्रमुख प्रा. काकासाहेब शिंदे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्रीडा दिनानिमित्त सुदृढ भारत अभियानासंदर्भात केलेल्या मार्गदर्शनाबद्दलची चित्रफीतही दाखविण्यात आली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी मेजर ध्यानचंद यांच्याबद्दल माहिती देऊन तरुणाई ही बलवान देशाची संपत्ती असल्याचे सांगितले. कार्यक्रमास लक्ष्मीकांत भिसे, प्रा. एस. आर. भारती, रासेयो विभागाचे प्रा. डॉ. जी. टी. राठोड, एस. के. कुलकर्णी यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक रासेयो विभागप्रमुख प्रा. एस. डी. आगलावे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी आणि क्रीडा विभागप्रमुख प्रा. डॉ. उमेश सलगर यांनी आभार मानले.

सुत्रसंचलन प्रा.डॉ.मल्लिनाथ बिराजदार यांनी तर आभार क्रिडा प्रमूख प्रा.डॉ. उमाकांत सलगर यांनी मानले.



**१९. कलम ३७० वर व्याख्यान** : दि. ३१/८/२०१९ रोजी महाविद्यालयामध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ''कलम ३७० व ३५ अ चे अस्तीत्व'' विषयावर ग्रामीण विद्या विकास उच्च माध्यमिक विद्यालय चपळगावचे प्रा. संतोष नरे यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला.




कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ.मल्लिनाथ लंगडे हे होते. प्रथम स्वामी विवेकानंद आणि सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन पाहूण्यांच्या हस्ते करण्यात आले.




चिनकरे अंकुश याने प्रास्ताविक व सामुदायिक गित गायन केल्यानंतर प्रमूख पाहूणे प्रा.संतोष नरे यांचे मार्गदर्शन झाले. आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. सुर्यकांत आगलावे यांनी मानले.

**२०. प्रि SRD/NRD संचलन निवड शिबीरासाठी विद्यार्थ्यांनीचा सहभाग:** दि.१२/९/२०१९ रोजी विद्यापीठ एन. एस.एस.विभागात दि.१४ ते १६ सप्टेंबर २०१९ दरम्यान प्रि SRD/NRD संचलन दिन निवड शिबीराकरिता कु.पाटू प्रियंका विजय (बी.एस्सी. द्वितीय) हिला पाठवले.

**२१. मराठवाडा मुक्ती दिनाची पूर्व तयारी:** दि.१६/९/२०१९ रोजी महाविद्यालयामध्ये मराठवाडा मुक्ती दिनाची पूर्व तयारी करतांना महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला व पताके चिटकावून घेतले.

**२२. मराठवाडा मुक्ती दिन:** दि. १७/९/२०१९ रोजी मराठवाडा मुक्ती दिन साजरा करतांना महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांनी सकाळी ७.३० वाजता येवून ध्वजारोहणाच्या ठिकाणी सडा रांगोळी काढली. सकाळी ठीक ८.१५ वाजता प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



ध्वजारोहणानंतर प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मुक्ती दिनाचे महत्व व इतिहास सांगितला. स्



वयंसेविका कु.प्रेरणा कांबळे हिने मराठवाडा मुक्ती दिनाबद्दल माहिती सांगितली. नंतर ९.३० वाजता डॉ. महेंद्रकर सी.एस उस्मानाबाद यांनी



नेत्रदान व अवयवदान या बद्दल विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना मार्गदर्शन केले व ५० फॉर्म भरून घेतले.



# प्राचार्यांसह विद्यार्थ्यांचा नेत्रदानाचा संकल्प, प्राध्यापक करणार देहदान

**जवाहर महाविद्यालयाच्या प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी घातला आदर्श**

प्रतिनिधी | अणदूर

येथील जवाहर महाविद्यालयातील प्राध्यापक सुरेखा भारती यांनी मुक्तिसंग्रामदिनी मरणोत्तर देहदान तर प्राचार्य उमाकांत चनशेट्टी यांच्यासह ४६ विद्यार्थ्यांनी नेत्रदानाचा संकल्प केला आहे.

मंगळवारी (दि.१७) मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून येथील नेत्र चिकित्सा अधिकारी डॉ. सी. एस. महिंद्रकर यांनी मरणोत्तर देहदान व नेत्र दानाचे महत्त्व पटवून देत सविस्तर चर्चा केली असता त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्राचार्य उमाकांत चनशेट्टी तसेच ४६ महाविद्यालयीन तरुणांनी नेत्रदानाचे संकल्प पत्र भरून दिले. विशेषतः यात ४० विद्यार्थिनींचा सहभाग आहे. यावेळी संस्कृत विषयाच्या प्राध्यापिका सुरेखा भारती यांनी देहदानाचे संकल्प पत्र भरून दिले. काळाची गरज व महत्त्व ओळखून समाजासमोर आदर्श ठेवलेल्या या निर्णयाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

प्राध्यापक सुरेखा भारती यांनी संकल्पपत्र भरून दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.मल्लिनाथ बिराजदार यांनी तर आभार प्रा.सुर्यकांत आगलावे यांनी मानले. दु १२ वाजता मा.ना.चद्रकांत (दादा) पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयातील २०० विद्यार्थीनीना ड्रेस मटेरियल वाटपाचा कार्यक्रम हुतात्मा मंगल कार्यालय अणदूर येथे घेण्यात आला.



**२३. <u>युवक मेळाव्यात सहभाग:</u>** दि. १८/९/२०१९ रोजी हॅलो मेडिकल फाउंडेशन संस्था, अणदूर च्या वतीने लिंगभाव समानता जाणिव जागृती



कार्यशाळेचे व युवक मेळाव्याचे आयोजन केले होते. त्यामध्ये सकाळी १०.०० ते दुपारी ४.३० पर्यंत राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ए कूण ४०



विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच प्रा. सुर्यकांत आगलावे (कार्यक्रमाधिकारी) व प्रा.डॉ.मल्लिनाथ बिराजदार यांनी ही कार्यशाळेत सहभाग घेतला. कार्यशाळेत मुंबई येथून आलेले प्रा. अमोल काळे, श्री.भगीरथ कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व चर्चा केली.

**२४. <u>स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०१९:</u>** दि.२१/९/२०१९ रोजी जिल्हा परिषद उस्मानाबादचे अधिकारी श्री रमाकांत



गायकवाड व अणदूरचे ग्रामविकास अधिकारी श्री.चव्हाण साहेब यांनी महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांकडून स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण.२०१९ ॲप डाऊनलोड करून आपला अभिप्राय कसा नोंदवायचा याची माहिती करून दिली व



प्राध्यापकांचे ही अभिप्राय नोंदवून घेतले.

**२५. <u>राष्ट्रीय सेवा योजना दिन:</u>** दि. २४/९/२०१९ रोजी महाविद्यालयात

राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमासाठी प्रमूख पाहूणे म्हणून



कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग चे प्राचार्य डॉ.संजय कोरेकर हे होते. प्रथम महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन पाहूण्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाधिकारी प्रा. सुर्यकांत आगलावे यांनी प्रास्ताविक करतांना मोकाशे ओंकार या




स्वयंसेवकाची एन.एस.एस. प्रतिनिधी म्हणून निवड केल्याचे जाहिर केले. सर्वांना एन.एस.एस.ची शपथ दिली. प्रमूख पाहूणे प्राचार्य डॉ. संजय कोरेकर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्राच्या सेवेसाठी मन, मनगट, मेंदू मजबूत करून व्यक्तीमत्व विकास करावा असे सांगूनएन.एस.एस. चे महत्व सांगितले.




अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना एन. एस.एस.मध्ये सक्रिय सहभाग घेवून व्यक्तीमत्व विकास करावा असे आवाहन केले. काही विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचलन चैतन्य भंडारकवठे यांनी तर आभार मोकाशे



## राष्ट्राच्या सेवेसाठी मन, मनगटासह मेंदू मजबूत करा

**प्राचार्य संजय कोरेकर यांचे प्रतिपादन**

प्रतिनिधी | अणदूर

राष्ट्रीय सेवा योजनेत 'सेवा' हा शब्द आहे. राष्ट्राची सेवा करण्यासाठी आपले मन, मनगट आणि मेंदू मजबूत करा. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी एक-एकं गुण वेचता आला पाहिजे. जोपर्यंत आपण संघटित होत नाही तोपर्यंत सुधारणा होणार नाही. आपण संघटित होऊन ग्रामीण भागाची सेवा करू या. कारण खरा भारत देश हा खेड्यात वसलेला आहे. गांधीजींनी दिलेल्या या संदेशाचे आपण पालन करू या असे आवाहन कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्गचे प्राचार्य डॉ. संजय कोरेकर यांनी येथील जवाहर महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चबशेट्टी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. कोरेकर, एनएसएस विभाग प्रमुख प्रा. एस. डी. आगलावे व प्रा. डॉ जी. टी. राठोड उपस्थित होते. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांनी जोपर्यंत स्वतःशीच स्पर्धा करत नाही तोपर्यंत आपल्या जीवनात परिवर्तन होत नाही. परिवर्तनाने राष्ट्र मोठे होते आणि हे परिवर्तन करण्यासाठी रासेयोच्या माध्यमातून संधी महाविद्यालयीन युवकांना मिळाल्याचे स्पष्ट केले. यावेळी विद्यार्थी प्रतिनिधी स्नेहा शिंदे, प्रेरणा कांबळे, आशामा मकानदार यांनी मनोगतात शिबिरातून आलेले अनुभव कथन केले. प्रास्ताविक प्रा. एस. डी.आगलावे यांनी तर सूत्रसंचालन चैतन्य भंडारकवठे यांनी केले यावेळी ओंकार मोकाशे या विद्यार्थ्यांची एनएसएस प्रतिनिधी म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील डॉ.सुनील राजपूत, प्रा. प्रसन्न कंदले, डॉ. राजशेखर वरशेट्टी, डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांच्यासह सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. कोरेकर यांनी अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात मार्गदर्शन केले.

ओंकार यांनी मानले.



25 September, 8:52 am

## जवाहर विद्यालयात सेवा योजना दिन उत्साहात

**अणदुर:** तुळजापूर तालुक्यातील अणदुर येथील जवाहर महाविद्यालयात मंगळवारी (दि.२४) राष्ट्रीय सेवा योजना दिन विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, प्राचार्य डॉ. संजय कोरेकर, प्रा. एस. डी. आगलावे, प्रा. डॉ. जी.टी.राठोड आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात स्नेहा शिंदे, प्रेरणा कांबळे, आशामा मकानदार आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. एस.डी. आगलावे यांनी, सूत्रसंचलन चैतन्य भंडारकवठे तर आभार ओंकार मोकाशे याने मानले. यावेळी ओंकार मोकाशे या विद्यार्थ्यांची एनएसएस प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आले. यावेळी डॉ. सुनील राजपूत, प्रा. प्रसन्न कंदले, डॉ. राजशेखर वरशेट्टी, डॉ. मलिनाथ बिराजदार उपस्थित होते.

**२६. श्रमदान:** दि.०१/१०/२०१९ रोजी श्रमदान करतांना विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करून घेतला.

**२७. महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती:** दि.२/१०/२०१९ रोजी महाविद्यालयात महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त प्रतिमा पूजन प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. पूजनानंतर प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




नंतर हुतात्मा मंगल कार्यालय अणदूर येथे जवाहर विद्यालय, जवाहर महाविद्यालय, गावातील नागरिक एकत्र येवून महात्मा गांधीना आवडणाऱ्या सामुदायिक प्रार्थना गायनाचा कार्यक्रम घेण्यात आला.



नंतर कै.आण्णासाहेब टाकळगव्हाणकर प्रतिष्ठान हिंगोली यांच्या वतीने महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती महोत्सवानिमित्त महात्मा गांधी यांच्या १५० दुर्मिळ चित्राचे प्रदर्शन घेण्यात आले व चरख्यावर सूत कसे कातले जाते याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना

दाखवण्यात आले.





**२८. <u>मतदार जागृती अभियान:</u>** दि. ९/१०/२०१९ रोजी महाविद्यालयामध्ये जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांचा संघ व चित्ररथ येवून मतदार जागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला.










त्यामध्ये प्रत्येकाने मतदान करावे व ते कसे करावे याचे प्रात्यक्षिक करून दाखवले व इ.व्ही.एम. मशीनची माहिती करून दिली. विद्यार्थ्यांची मानवी साखळी करून लोकशाहीच्या व मतदान जागृतीच्या घोषणा देण्यात आल्या व मार्गदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

**२९. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती:** दि.१५/१०/२०१९ रोजी महाविद्यालयात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती **'वाचन प्रेरणा दिन'** म्हणून साजारी करतांना दु. १ वाजता प्रतिमा पूजन करण्यात आले.



महाविद्यालयात विद्यापीठ परिक्षा चालू असल्यामुळे सकाळचा पेपर संपल्यानंतर कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन केल्यानंतर विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व सांगून, भरपूर वाचन करण्याचे आवाहन करण्यात आले.

**३०. पंडित जवाहरलाल नेहरू जयंती:** दि.१४/११/२०१९ रोजी महाविद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू जयंती निमित्त प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रभारी प्राचार्य डॉ.मल्लिनाथ लंगडे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन केल्यानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

**३१. इंदिरा गांधी जयंती:** दि. १९/११/२०१९ रोजी महाविद्यालयात इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन करण्यात आले.



प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन केल्यानंतर विद्यार्थ्यांना व्याख्यानाचा कार्यक्रम हूतात्मा मंगल कार्यालय, अणदूर येथे घेण्यात आला. व्याख्यानासाठी प्रमूख पाहूणे जिल्हा परिषद उस्मानाबादचे माजी अध्यक्ष श्री.नानासाहेब पाटील हे होते.







अणदूर (ता. तुळजापूर) : जवाहर महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना नानासाहेब पाटील. यावेळी माजी आमदार आलुरे गुरुजी, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी.

**जवाहर महाविद्यालयात कार्यक्रम**

**अणदूर :** माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त जवाहर महाविद्यालय व जवाहर विद्यालयाच्या वतीने मंगळवारी (ता. १९) कार्यक्रम घेण्यात आला. उस्मानाबादचे माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. माजी आमदार सिद्रामप्पा आलुरे गुरुजी अध्यक्षस्थानी होते. यावेळी श्री. पाटील यांनी इंदिरा गांधी यांचे जीवनकार्यावर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, मुख्याध्यापक विवेकानंद स्वामी, बाबूराव कुलकर्णी, नीलकंठप्पा नरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले. प्रवीण गुरव यांनी आभार मानले. यावेळी गावातील नागरिक विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.



लोकमत

**थोरा-मोठ्यांचे विचार आत्मसात करावेत : पाटील**

लोकमत न्यूज नेटवर्क

अणदूर : स्वावलंबनाशिवाय स्वाभिमानाने जगणे अशक्य आहे. विद्यार्थ्यांनी थोरा-मोठ्यांचे विचार आत्मसात करावे, आपला वेळ नाहक कामात न घालता पुस्तक वाचण्यात घालवावा, असे मत उस्मानाबाद येथील माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.

येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य विभागाच्या राष्ट्रीय सेवायोजना कार्यक्रमांतर्गत इंदिरा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सि. ना. आलुरे गुरुजी तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक नीलकंठ नरे, बाबूराव कुलकर्णी, जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. उमाकांत चन्नशेट्टी, मुख्याध्यापक विवेकानंद स्वामी उपस्थित होते. याच कार्यक्रमात सि. ना. आलुरे गुरुजी यांनी इंदिरा गांधी यांचे जीवनकार्य सांगितले. सूत्रसंचालन प्रा. एम. बी. बिराजदार यांनी तर प्रास्ताविक जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. उमाकांत चन्नशेट्टी यांनी केले. आभार प्रवीण गुरव यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. उमेश सलगर, प्रा. सूर्यकांत आगलावे, प्रा. मल्लीनाथ लंगडे, प्रा. विवेकानंद वाहुळे, प्रा. धनंजय गटलेवार, प्रा. एस. व्ही. राजमाने आदींनी पुढाकार घेतला.

अणदूर येथे इंदिरा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना नानासाहेब पाटील. व्यासपीठावर सि. ना. आलुरे गुरुजी, प्राचार्य प्रा. डॉ. उमाकांत चन्नशेट्टी, नीलकंठ नरे, बाबूराव कुलकर्णी, विवेकानंद स्वामी आदी.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूरचे सचिव आदरणीय सि.ना.आलुरे गुरूजी हे होते. प्रथम इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर पाहूण्यांनी विद्यार्थ्यांना इंदिरा गांधी यांच्या जीवन कार्याची माहिती सांगितली. अध्यक्षिय समारोपात श्री.सि. ना.आलुरे गुरूजींनी विद्यार्थ्यांना इंदिरा गांधी बरोबरचे काही अनुभव सांगितले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, सुत्रसंचलन प्रा.डॉ.मल्लिनाथ बिराजदार तर आभार सहशिक्षक प्रविण गुरव यांनी मानले. व्याख्यानाला जवाहर विद्यालयाचे विद्यार्थी ही मोठया संख्येने उपस्थित होते.

**३२. <u>यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी</u>:** दि. २५/११/२०१९ रोजी महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमित्त प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. प्रतिमा पूजन केल्यानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



**३३. <u>संविधान दिन</u>:** दि.२६/११/२०१९ रोजी महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व

संविधान प्रास्ताविकाच्या बॅनरचे अनावरण करण्यात आले.





नंतर संविधान प्रास्ताविकाचे मराठीतून प्रा.डॉ. मल्लिनाथ बिराजदार व इंग्रजीतून प्रा.डॉ.अनिता मुदकण्णा यांनी वाचन केले.



विद्यार्थ्यांनी त्यांच्या मागून वाचन केले. नंतर प्रा.डॉ.सोमगोंडे एन.एस. यांनी विद्यार्थ्यांना संविधानाबद्दल मार्गदर्शन केले.



**३४. महात्मा जोतिबा फुले स्मृति दिन:** दि.२८/११/२०१९ रोजी महाविद्यालयात महात्मा जोतिबा फुले स्मृति दिननिमित्त प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व प्रा.डॉ.सुनिल रजपूत यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. प्रतिमा पूजन केल्यानंतर प्रा.डॉ.सुनिल रजपूत यांनी विद्यार्थ्यांना महात्मा जोतिबा फुले यांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली व मार्गदर्शन केले.




**३५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन:** दि.६/१२/२०१९ रोजी महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब

आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिमा पूजन प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व ग्रामिण विद्याविकास उच्च माध्यमिक विद्यालय, चपळगावचे सहशिक्षक संतोष नरे यांच्या हस्ते करण्यात



आले. प्रतिमा पूजनानंतर श्री.संतोष नरे यांनी विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल मार्गदर्शन केले.

**३६. लक्ष्मीबाई (आक्का) नागप्पा आलुरे पूण्यतिथी:** दि.१५/१२/२०१९ रोजी महाविद्यालयात लक्ष्मीबाई (आक्का) नागप्पा आलुरे यांच्या पूण्यतिथी निमित्त



प्रतिमा पूजन प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. पूजनानंतर प्रा.डॉ.मल्लिनाथ बिराजदार यांनी श्री.सि.ना.आलुरे गुरूजींनी आईबद्दल लिहिलेले विचार वाचून दाखवले व मार्गदर्शन केले.

**३७. विद्यापीठ स्तरीय स्वच्छता शिबीर व आव्हान रंगीत तालीम मध्ये सहभाग:** दि. १८ ते २४ डिसेंबर २०१९ दरम्यान विद्यापीठ स्तरीय स्वच्छता शिबीर व दि. २३ ते २४ डिसेंबर २०१९ दरम्यान आव्हानमध्ये प्रशिक्षित स्वयंसेवकाची रंगीत तालीमसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ



औरंगाबाद येथे १. कु. शिंदे जयश्री धनाजी २. कु. बिराजदार दिपाली प्रकाश ३. चव्हाण संतोष खंडू ४. वलदोडे ओंकार गौरिशंकर यांनी सहभाग घेतला.



**३८. <u>संत गाडगेबाबा पूण्यतिथी:</u>** दि. २०/१२/२०१९ रोजी महाविद्यालयात संत गाडगेबाबा यांच्या पूण्यतिथी निमित्त प्रतिमा पूजन प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. पूजनानंतर प्रा.डॉ.मल्लिनाथ बिराजदार व प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना संत गाडगेबाबा यांच्या बद्दल माहिती सांगितली.



**३९. <u>साने गुरूजी जयंती:</u>** दि. २४/१२/२०१९ रोजी महाविद्यालयात साने गुरूजी जयंती निमित्त प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रतिमा पूजनानंतर प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



**४०. <u>वार्षिक विशेष शिबीर:</u>** दि. २८/१२/२०१९ ते ३/१/२०२० दरम्यान मौजे बारूळ ता.तुळजापूर येथे **''पर्यावरण संवर्धनासाठी युवा''** या विषयावर वार्षिक विशेष शिबीर घेण्यात आले.

**४१. <u>९३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सहभाग:</u>** दि. ११/१/२०२० रोजी उस्मानाबाद येथे होत असलेल्या ९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सहभागी होण्यासाठी १० विद्यार्थी व २ प्राध्यापक गेले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छता करत करत साहित्य संमेलनाचा



आनंद घेतला.





मराठी साहित्य संमेलन विशेष

www.tarunbharat.org

# शब्दची आमच्या जीवाचे जीवन...

मराठवाड्यातील पुस्तकप्रेमींच्या गर्दीने प्रकाशक भारावले, शालेय मुलांसह शिक्षकांकडून लाखोंची पुस्तके खरेदी

**४२. <u>राज्यस्तरीय शिबीरात सहभाग</u>:** दि. ११/१/२०२० रोजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी सोमनाथ राजेंद्र स्वामी याला दि.१२ ते १८




जानेवारी २०२० दरम्यान साने गुरूजी राष्ट्रीय स्मारक वडघर ता.माणगांव जि. रायगड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शिबीरासाठी पाठवण्यात आले.



**४३. <u>स्वामी विवेकानंद व जिजाऊ जयंती</u>:** दि.१२/१/२०२० रोजी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद व जिजाऊ जयंती निमित्त प्रतिमा पूजन प्रभारी प्राचार्य डॉ.मल्लिनाथ लंगडे यांच्या हस्ते करण्यात आले.



**४४. विद्यापीठ नामविस्तार दिन:** दि. १४/१/२०२० रोजी महाविद्यालयात विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा



करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमूख पाहूणे म्हणून कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग चे सेवानिवृत्त प्राध्यापक श्री शिवाजी बनसोडे हे होते. प्रथम प्रमूख पाहूणे प्रा.बनसोडे सर, आदरणीय सि.ना.आलुरे गुरूजी यांच्या



हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पूजनानंतर श्री.गो.का.बिच्चे, श्री.सि.ना. आलुरे गुरूजी, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व प्रा. शिवाजी बनसोडे यांच्या मार्गदर्शनाचा कार्यक्रम झाला.



आभार प्रा.डॉ.मल्लिनाथ बिराजदार



यांनी मानले.

**४५. नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती व श्रमदान:** दि.२३/१/२०२० रोजी महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती निमित्त प्रतिमा पूजन प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. पूजनानंतर प्रा.डॉ.सुरेखा भारती यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



त्यानंतर दुपारी १२.०० ते २.००

दरम्यान विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला व खेळाच्या मैदानावर लाल माती टाकून श्रमदान केले.





**<u>४६. उत्कर्ष राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा सहभाग:</u>** दि. २४/१/२०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी चव्हाण संतोष खंडू याला दि.२८ ते ३१ जानेवारी दरम्यान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे होणाऱ्या उत्कर्ष सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी होण्याकरिता सरावासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचा विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे पाठवण्यात आले.

**<u>४७. प्रजासत्ताक दिनाची पूर्व तयारी:</u>** दि.२५/१/२०२० रोजी प्रजासत्ताक दिनाची पूर्व तयारी करतांना विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला,





रस्त्याच्या कडेचे दगड व्यवस्थीत लावून त्याला चूना व काव लावण्यात आली. महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये असलेल्या झाडालाही चूना व काव लावण्यात आली.







पताके चिटकावून घेतले व ध्वजारोहणाची तयारी केली.

**४८. प्रजासत्ताक दिन साजरा:** दि. २६/१/२०२० रोजी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करतांना सकाळी विद्यार्थ्यांनी ध्वजारोहणाच्या ठिकाणी सडा रांगोळी काढली. ठीक ७.१५ वाजता प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



नंतर ७.३०ते ९.०० दरम्यान प्रभात फेरी मध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते गायली व घोषणा दिल्या. सकाळी ठीक ९.०० वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये सामुदायिक ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण अणदूरच्या सरपंच सौ.सरिता मोकाशे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमूख पाहूणे म्हणून सन १९९४ ला जवाहर विद्यालयातून महाराष्ट्रात पहिला क्रमांक मिळवलेले श्री सचिन हराळकर हे होते. सकाळी ९ ते ११ दरम्यान गावातील विविध शाळेचे संचालन, देशभक्तीवर गीते, विविध गुणदर्शनचे सादरीकरण झाले. शेवटी श्री हराळकर व श्री.सि.ना.आलुरे गुरूजी यांचे मार्गदर्शन झाले.

**४९. महात्मा गांधी स्मृती दिन:** दि. ३०/१/२०२० रोजी महाविद्यालयात महात्मा गांधी यांच्या स्मृती दिनानिमित्त प्रतिमा पूजन प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. पूजनानंतर सकाळी १० ते ११ दरम्यान विद्यालयामध्ये गांधीजींना आवडणाऱ्या सामुदायिक प्रार्थना गायनाचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. ठीक ११






वाजता गांधीजींना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.

**५०. <u>व्हॅलेंटाइन डे साजरा:</u>** दि.



## कोणतीही फुलराणी यापुढे जळणार नाही, जवाहर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतली प्रतिज्ञा

अणदुर, दि. १४ (प्रतिनिधी) - जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर येथे व्हॅलेंटाईन डे च्या निमित्ताने एकही फुलराणी जळणार नाही ही प्रतिज्ञा घेण्यात आली.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी म्हणाले की, हिंगणघाट येथे घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. स्त्रीलाही माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण होईपर्यंत आत्मसन्मान पूर्वक स्वतः च्या जीवनाला आकार देत, मायभूमीवर, माता- भगिनीवर प्रेम करावे. प्रेमाचा उदात्त हेतू लक्षात घेऊन समाजासमोर आदर्श निर्माण करावा, असे आवाहन केले.

याचवेळी पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यात शाहिद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी-विध्यर्थिनी व शिक्षकेतर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

स्त्रीच्या सन्मानातच सर्वांचे सौख्य सामावले आहे म्हणून या पुढे, एकही फुलराणी जळणार नाही अशी प्रतिज्ञा प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी विद्यार्थ्यांना दिली, आणि प्रतिज्ञा घेत व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यात आला.

१४/२/२०२० रोजी व्हॅलेंटाइन डे



महाविद्यालयात साजरा करतांना प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना खऱ्या प्रेमाचा अर्थ सांगितला. नंतर दिव्य मराठी च्या आवाहनानुसार **"आता एकही फुलराणी जळणार नाही"** ही प्रतिज्ञा प्रा.डॉ. बिराजदार यांनी पुढे वाचली त्यानुसार सर्वांनी प्रतिज्ञा घेतली.





## जवाहर विद्यालयात व्हॅलेंटाईन डे निमित्त प्रतिज्ञा

**अणदूर** : तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने एकही फुलराणी जळ-णार नाही. ही प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. चनशेट्टी यांनी हिंगणघाट येथे घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. स्त्रीलाही माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण होईपर्यंत आत्मसन्मान पूर्वक स्वतः च्या जीवनाला आकार देत, म ायभूमीवर, माता-भगिनीवर प्रेम करावे. प्रेमाचा उदात्त हेतू लक्षात घेऊन समाजासमोर आदर्श निर्माण करावा, असे आवाहन केले. याचवेळी पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



अणदूर : व्हॅलेंटाईन-डेनिमित्त यापुढे एकही फुलराणी जळणार नाही अशी शपथ घेताना जवाहर महाविद्यालयात विद्यार्थी.

### व्हॅलेंटाईन डे साजरा

**अणदूर :** यापुढे एकही फुलराणी जळणार नाही अशी प्रतिज्ञा जवाहर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शुक्रवारी (ता.१४) घेण्यात आलेल्या व्हॅलेंटाईन डे कार्यक्रमात घेतली. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनात म्हणाले, की हिंगणघाट येथे घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. स्त्रीलाही माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण होईपर्यंत आत्मसन्मानपूर्वक स्वतःच्या जीवनाला आकार देत, मायभूमीवर, माता-भगिनींवर प्रेम करावे. प्रेमाचा उदात्त हेतू लक्षात घेऊन समाजासमोर आदर्श निर्माण करावा, असे आवाहन केले. यावेळी पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. स्त्रीच्या सन्मानातच सर्वांचे सौख्य सामावले आहे, म्हणून यापुढे, एकही फुलराणी जळणार नाही, अशी प्रतिज्ञा प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी विद्यार्थ्यांना दिली आणि प्रतिज्ञा घेत व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यात आला.

**५१. <u>शिव जयंती:</u>** दि.१९/२/२०२० रोजी महाविद्यालयात शिव जयंती साजरी करण्यात आली. त्यानिमित्त प्रथम प्रमूख पाहूणे प्रसिद्ध शिव व्याख्याते प्रा.डॉ.रावसाहेब पाटील, सोलापूर यांच्या हस्ते महाविद्यालयामध्ये सकाळी ९.४० वाजता प्रतिमा पूजन करण्यात आले.



प्रतिमा पूजनानंतर विद्यालयामध्ये प्रमूख पाहूणे श्री.रावसाहेब पाटील यांचे शिव चरित्र व्याख्यान झाले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव आदणीय सि. ना.आलुरे गुरूजी हे होते.



प्रास्ताविक प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांनी तर आभार सहशिक्षक प्रविण गुरव यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे व विद्यालयाचे विद्यार्थी मोठया संख्या उपस्थित होते.



# छत्रपतींचा गनिमीकावा सुभाषचंद्र बोस यांनी जाणून स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले

शिवजयंतीनिमित्त व्याख्यानात शिवचरित्रकार रावसाहेब पाटील यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | अणदूर

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या गनिमी काव्याने शत्रूवर जरब बसवली होती. स्वातंत्र्य सेनानी डॉ. सुभाषचंद्र बोस यांनी तुरुंगात अभ्यास करून गनिमी कावा जाणून घेतला व स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केल्याचे प्रतिपादन शिवचरित्रकार रावसाहेब पाटील यांनी केले. येथील जवाहर विद्यालयात शिवजयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

व्याख्याते रावसाहेब पाटील यांनी यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांचे बालपण, हिंदवी स्वराज्याची स्थापना, स्वराज्यासाठी केलेला संघर्ष, सर्व जाती-धर्मांच्या मावळ्यांना संघटित करून रयतेचे निर्माण केलेले राज्य, गडकिल्ल्याचे, झाडांचे संगोपन, गडावरील जलव्यवस्थापन, विविध आक्रमणे, अफझलखान वध, स्त्रियांचे संरक्षण, पर्यावरण रक्षण, महाराष्ट्रातील धार्मिक स्थळांवर मुसलमान साम्राज्या कडून झालेली नासधूस, आग्राहून झालेली सुटका, आरमाराच्या निर्मितीसाठी लाकूड महत्त्वाचे असुन त्यासाठी केलेले वृक्षारोपण आदी विविध मुद्यांना स्पर्श करून प्रभावी घटनाक्रम मांडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सि. ना. आलुरे गुरुजी, कोषाध्यक्ष बिच्चे गुरुजी, माजी जि. प. सदस्य महादेवप्पा आलुरे, मुख्याध्यापक विवेकानंद स्वामी यांच्या हस्ते शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य उमाकांत चनशेट्टी यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय समारोपात आलुरे गुरुजींनी मार्गदर्शन केले.

अणदूर येथील जवाहर विद्यालयात रावसाहेब पाटील यांनी मार्गदर्शन केले.

## शैक्षणिक साहित्याने गौरव

आलुरे गुरुजींनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा त्याग मोठा असून त्यांचे जीवनचरित्र वाचा असे आवाहन केले. याच कार्यक्रमात चित्रकला, निबंध स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले. व्याख्यानास सेवानिवृत्त गुरूजन, माजी विद्यार्थी, पालक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रवीण गुरव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

**५२. मराठी भाषा गौरव दिन व स्नेहसंमेलन:** दि. २७/०२/२०२० रोजी महाविद्यालयामध्ये मराठी भाषा गौरव दिन व स्नेहसंमेलन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून स्वराज्य रक्षक संभाजी या दूरदर्शन मालिकेतील बहिरजी नाईक फेम श्री अजयजी तपकिरे हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे सचिव आदरणीय आलुरे गुरुजी हे होते. प्रथम कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पुजन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले पुजनानंतर प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषा व संस्कृती बद्दल माहिती दिली. बहिरजी नाईक यांचे काही डायलॉग बोलून दाखवले शेवटी आदरणीय सि. ना. आलुरे गुरुजींनी अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांना



मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमाव्यतिरिक्त संस्थेच्या वतीने महाविद्यालयात होणाऱ्या वेगवेगळया कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला व प्रत्येक आठवडयाच्या शुक्रवारी २ तास श्रमदान व प्रबोधनासाठी घेण्यात आले.

.

# अणदुर येथे जवाहर महाविद्यालयच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे दिमाखदार उद्घाटन

अणदुर, दि. २७ (प्रतिनिधी) शिक्षण प्रसारक मंडळ संचलीत कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय अणदुर येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सि ना आलुरे गुरुजी तर प्रमुख उद्घाटक सिने अभिनेते अजय तपकिरे हे होते तर संस्थेचे कोषाध्यक्ष गोपीनाथ बिच्चे,प्राचार्य डॉ उमाकांत चन्नशेट्टी, जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेकानंद स्वामी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबुराव कुलकर्णी, सेवानिवृत्त प्राचार्य संगमेश्वर जळकोटे,प्रा स्वामी,माजी जि प सदस्या पार्वती घोडके यांची उपस्थिती होती

यावेळी सिने अभिनेते अजय तपकिरे ,सि ना आलुरे गुरुजी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जल्लोष युवा शक्तीचा या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा करून कार्यक्रमात लक्ष वेधून घेतले महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा,काव्यवाचन, मेहंदी व हस्तकला स्पर्धा, विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करुन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ उमाकांत चन्नशेट्टी यांनी केले,वार्षिक अहवालाचे वाचन डॉ प्रा अनिता मुदकन्ना यांनी केले, सुत्रसंचलन प्रा एम बी बिराजदार यांनी केले तर आभार प्रा सुर्यकांत आगलावे यांनी मानले. यासाठी डॉ मिना जाधव, डॉ मल्लीनाथ लंगडे, डॉ अंकुश कदम, डॉ एस जी बिराजदार, डॉ एस के कुलकर्णी,प्रा आर एस नळगे,प्रा विवेकानंद वाहुळे,प्रा माधुरी गडसिंग,प्रा डि एस सुर्यवंशी,प्रा सुनिल रजपूत,प्रा एम टी मुसांडे,प्रा टी एन गटलेवार,प्रा एस एस राऊत, काशिनाथ करपे,प्रा जी टी राठोड,प्रा प्रसन्न कंदले यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी. यांनी पद्माकार घेतला होता





# जवाहर महाविद्यालयात स्नेहसंमेलनाचे उद्घाटन

**अणदुर** : येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलीत कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सि. ना. आलुरे तर प्रमुख उद्घाटक सिने अभिनेते अजय तपकिरे हे होते. संस्थेचे कोषाध्यक्ष गोपीनाथ बिच्चे, प्राचार्य डॉ उमाकांत चन्नशेट्टी, मुख्याध्यापक विवेकानंद स्वामी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबुराव कुलकर्णी, सेवानिवृत्त प्राचार्य संगमेश्वर जळकोटे, प्रा स्वामी, माजी जि प सदस्या पार्वती घोडके यांची उपस्थिती होती. यावेळी सिने अभिनेते अजय तपकिरे, सि. ना. आलुरे गुरुजी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जल्लोष युवा शक्तीचा या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा करून कार्यक्रमात लक्ष वेधून घेतले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन, मेहंदी व हस्तकला स्पर्धा, विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करुन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यात आला.प्रास्ताविक प्राचार्य डॉ उमाकांत चन्नशेट्टी यांनी केले. वार्षिक अहवालाचे वाचन डॉ. प्रा अनिता मुदकन्ना यांनी केले. सुत्रसंचलन प्रा एम बी बिराजदार यांनी केले. तर आभार प्रा सुर्यकांत आगलावे यांनी मानले. यासाठी डॉ मिना जाधव, डॉ मल्लीनाथ लंगडे, डॉ अंकुश कदम, डॉ एस जी बिराजदार, डॉ एस के कुलकर्णी, प्रा आर एस नळगे, प्रा विवेकानंद वाहुळे, प्रा माधुरी गडसिंग, प्रा डी. एस सुर्यवंशी, प्रा सुनिल रजपूत, प्रा एम टी मुसांडे, प्रा टी एन गटलेवार,

सकाळ

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून श्रमप्रतिष्ठेला मिळते प्रोत्साहन

## डॉ. सूर्यकांत आगलावे यांचे मत, कदमापूर येथील शिबिराचा समारोप

**उमरगा, ता. २५ (बातमीदार) :** 'राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवासी शिबिरांमधून स्वयंसेवकांनी केलेले श्रमदान त्यांच्यावर श्रमसंस्कार घडवते. श्रमप्रतिष्ठा वृद्धिंगत होऊन आत्मविश्वास वाढल्याने श्रमसंस्कारामुळे आदर्श नागरिक घडवण्यास मदत होते. गटचर्चा, व्याख्यानांच्या माध्यमातून व्याख्यात्यांचे जीवनानुभव स्वयंसेवक ग्रहण करीत असल्याने त्यांचे अनुभवविश्व प्रगल्भ होते, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कदमापूर (ता. उमरगा) येथे आयोजित ग्रामस्वच्छता व जलसंवर्धनासाठी विशेष युवा शिबिराचा समारोप शुक्रवारी (ता. २४) झाला.




**कदमापूर (ता. उमरगा) : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिर समारोप कार्यक्रमात बोलताना डॉ. सूर्यकांत आगलावे. यावेळी प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, लक्ष्मण मंमाळे आदी.**

त्यावेळी डॉ. आगलावे बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव अध्यक्षस्थानी होते. प्रमुख उपस्थिती सरपंच लक्ष्मण मंमाळे यांची होती.

विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेचे तत्त्व अंकुरित करण्यासाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वर्षभर अनेक उपक्रम राबवले जातात. त्यापैकी निवासी शिबिर हा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम असतो. निवासी शिबिर विद्यार्थ्यांवर श्रमसंस्कार करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र बदल घडवून आणत असतात, असे मत प्राचार्य डॉ. जाधव यांनी व्यक्त केले.

ग्रामस्थांच्या वतीने प्रशांत भोसले यांनी मनोगत व्यक्त करताना स्वयंसेवकांनी केलेल्या कामाची पावती देत पुढल्याही वर्षी कदमापूर येथेच निवासी शिबिर घ्यावे, अशी विनंतीही केली.

यावेळी उपसरपंच धनराज बिराजदार, ग्रामविकास अधिकारी पवनकुमार माळी, पोलिस पाटील भास्कर झाकडे, प्रकाश कुंभार, दत्ता भाले, विठ्ठल जमादार यांच्यासह कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. बुवा, डॉ. ए. के. कटके, प्रा. चिकुंद्रे, डॉ. सी. डी. करे, प्रा. मुरलीधर जाधव, प्रा. डी. व्ही. बोंदर, डॉ. पद्माकर पिटले, डॉ. जी. एन. सोमवंशी, मोहन पवार, विनायक जाधव, विजय अंसारवाडे आदी उपस्थित होते.कार्यक्रमाधिकारी डॉ. देवरकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सन्मुख मुछट्टे यांनी सूत्रसंचालन केले. महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष अशोक मंमाळे यांनी आभार मानले.

Aurangabad, Osmanabad-Today
26/01/2020 Page No. 3

पुढारी

# 'रासेयो'तून उत्तम नागरिक घडतो

## डॉ. आगलावे : छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या शिबिराचा समारोप

**उमरगा, पुढारी वृत्तसेवा :** राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवासी शिबिरात स्वयंसेवकांनी केलेल्या श्रमदानामुळे त्यांच्यावर श्रमसंस्कार घडवतात. ज्यामुळे आत्मविश्वास व समाजसेवेचा भाव वाढतो जो उत्तम नागरिक घडवण्यासाठी मदत करतो, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी व्यक्त केले.




शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या कदमापूर (ता.उमरगा) येथे आयोजित करण्यात आलेल्या ग्रामस्वच्छता व जलसंवर्धन साठी विशेष युवा शिबिराच्या शुक्रवार, दि २४ रोजी समारोपप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव होते. यावेळी सरपंच लक्ष्मण मंमाळे, उपसरपंच धनराज बिराजदार, ग्राम विकास अधिकारी पवनकुमार माळी, पोलिस पाटील भास्कर झाकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना आगलावे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील स्वयंसेवकाना श्रमदान, बौद्धिक गटचर्चा व व्याख्यानांच्या माध्यमातून विचारवंताचे जीवनानुभव आत्मसात करता येऊ शकतात. ज्यामुळे अनुभव विश्वाच्या प्रगल्भतेसाठी उपयोग फायदा होतो असे शेवटी सांगितले. तर प्राचार्य डॉ. जाधव म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेचे तत्त्व अंकुरित करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वर्षभर विविध उपक्रम राबवले जातात. त्यापैकी निवासी शिबीर हा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम असून यात विद्यार्थ्यांवर श्रमसंस्कार करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र बदल घडवितात.

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने प्रशांत भोसले यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला प्रकाश कुंभार, दत्ता भाले, विठ्ठल जमादार, प्रा. आर एम. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. बुवा, डॉ. ए. के. कटके, प्रा. चिकुंद्रे, डॉ. सी. डी. करे, प्रा. मुरलीधर जाधव, प्रा. डी. व्ही. बोंदर, डॉ. पद्माकर पिटले, डॉ. जी. एन. सोमवंशी, मोहन पवार, विनायक जाधव, विजय अंसारवाडे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सन्मुख मुछट्टे यांनी केले तर तंटामुक्त समितीचे अध्यक्ष अशोक मंमाळे यांनी आभार मानले.

My Latur Edition
26 Jan, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com



